पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १६१ दिनांक - १३/०३/२०२५**

युनिट ६ गुन्हे शाखा, पुणे शहर

## घरगुती गॅस सिलेंडर मधुन गॅस चोरी करणाऱ्यास केले जेरबंद

दि.१२/०३/२०२५ रोजी युनिट ६ कडील प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.वाहिद पठाण व युनिट ६ कडील पथक असे लोणी काळभोर पो.स्टे. हद्दीत गस्त करीत असताना **पोलीस अंमलदार शेखर काटे** यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, महादेव मंदिरा जवळ,लोणी काळभोर, पुणे येथे एक इसम घरगुती गॅस सिलेंडर मधील गॅस पाईपचे सहाय्याने काढून तो लहान मोठया व कमर्शियल गॅस सिलेंडर मधे भरत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पुरवठा अधिकारी श्री. इम्रान मुलानी व पथक,लोणीकाळभोर पोलीस स्टेशन कडील स्टाफ यांचे सह सदर ठिकाणी छापा कारवाई केली असता त्याठिकाणी इसम नामे **मदन माधव बामणे वय २० वर्षे रा.महादेव मंदिराजवळ,लोणी काळभोर,पुणे** हा घरगुती गॅस सिलेंडर मधील गॅस पाईपचे सहाय्याने काढून तो लहान मोठ्या व कमर्शियल गॅससिलेंडर मधे भरत असताना मिळून आला आहे. सदर ठिकाणी वेग वेगळ्या कंपनीचे लहान मोठे व कमर्शियल गॅससिलेंडर एकूण १३५, इलेक्ट्रिक वजनकाटा, गॅस भरण्यासाठी लागणारे पाईप, नोजल असा एकूण ०२,१३,९५०/- रु. किमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे.

सदर आरोपीता विरुद्ध **लोणीकाळभोर पो.स्टे.गु.र.नं.१२५/२०२५ भा.न्या.सं.कलम २८७,२८८ सह जीवनावश्यक वस्तू कायदा,१९५५ चे कलम ३,७** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी लोणी काळभोर पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे २) श्री.राजेंद्र मुळीक,यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युनिट ६ गुन्हे शाखा, चे प्रभारी श्री.वाहिद पठाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणीकाळभोर पो.स्टे.चे श्री.राजेंद्र पन्हाळे सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे,पोलीस उप-निरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस उप-निरीक्षक अनिल जाधव (लोणीकाळभोर पो.स्टे.) पोलीस अंमलदार बाळासाहेब सकटे,रमेश मेमाणे,नितीन मुंढे,कानिफनाथ कारखेले,सुहास तांबेकर,ऋषीकेश ताकवणे,सचिन पवार,ऋषीकेश व्यवहारे,शेखर काटे,गणेश डोंगरे, समीर पिलाने,नितीन धाडगे,बाळासाहेब तनपुरे,मपोअं.प्रतिक्षा पानसरे,किर्ती मांदळे,लोणीकाळभोर पो.स्टे.कडील पोलीस अंमलदार प्रदिप क्षीरसागर,अक्षय कटके,सचीन सोनवणे, बालाजी बांगर यांनी केली आहे.

